



# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर

## लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरांची योग्य शुश्रुषा करा! मरतुक टाळा

माफसू/ॲडव्हायजरी– १२/२०२३ दि. १७ ऑगस्ट २०२३

आपल्या राज्यात मागील एक वर्षापासून गोवंशात लंम्पी आजाराची साथ चालू असून आजाराच्या तीव्रतेनुसार बाधित पशुंमध्ये विविध लक्षणे आढळून येत आहेत. मागील वर्षी या आजाराची साथ जास्त तीव्र होती तर यावर्षी तुलनेने कमी प्रमाणात या आजाराचा प्रादुर्भाव राज्याच्या बहुतांश जिल्ह्यांत दिसून येत आहे आणि आजाराची लागण त्याचप्रमाणे मरतुकीचे प्रमाण तुलनेने वासरांमध्ये जास्त प्रमाणात आढळून आले आहे. हा आजार विषाणूजन्य असल्याने त्यावर १०० टक्के प्रभावी औषधोपचार उपलब्ध नाही. मात्र शेतकऱ्यांनी ज्या जनावरावर तात्काळ योग्य उपचार करून घेतला व चांगली सुश्रुषा केली ती जनावरे बरी होत आहेत. **सर्वसामान्यपणे रोगातून दुरुस्त होणाऱ्या जनावरांत ८० टक्के सुश्रुषा व २० टक्के औषधोपचाराचा वाटा दिसून येत आहे.** म्हणून पशुपालकानी रोगी जनावराची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व आपले अनमोल पशुधन वाचविण्यासाठी खालील प्रमाणे सुश्रुषा करावी.

### १. आहार विषयक काळजी :–

- रोगी जनावरांची प्रतिकारशक्ती उत्तम राहण्यासाठी संतुलित आणि सकस आहार नियमित देण्यात यावा. त्याचप्रमाणे जनावरांचा आहार व पाणी पिणे उच्चतम राहील यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी.
- आजारी जनावरांना हिरवा, मऊ व लूसलुशीत चारा तसेच चांगल्या प्रतीचा प्रथिने व उर्जायुक्त खुराक (ढेप / मका आदी) दयावा.
- पिण्याचे स्वच्छ पाणी मुबलक प्रमाणात वारंवार उपलब्ध करून दयावे. पाण्यामध्ये मीठ व गुळ टाकून दिल्यास जनावर पाणी आवडीने पितात तसेच त्यांना खनिजक्षार व उर्जा मिळेल. थंडीच्या काळात हलके कोमट पाणी दिल्यास जनावर आवडीने पाणी पितात. पाणी पिणे चालू राहील्यास अत्यवस्थ जनावर सुध्दा दुरुस्त होत आहेत.
- ज्या बाधित जनावरांना मान, पाय छातीवरील सुजेमुळे मान खाली करता येत नाही अशा जनावरांना चारा व पाणी तोंडाच्या उंचीवर उपलब्ध करून देण्यात यावे. **गरजेप्रमाणे चारा हाताने खाऊ घातल्यास रोगी जनावर चारा खात असल्याचे दिसून आले आहे.**

### २. पुरक खाद्य पदार्थांचा अंतर्भाव :–

- आजारी जनावरांनी चारा खाणे कमी केले असेल तर अशा जनावरांना उर्जावर्धक (प्रोपायलीन ग्लायकॉल) औषधे तोंडावाटे देण्यात यावीत.
- रोगप्रतिकारशक्ती चांगली ठेवण्यासाठी आहारात नियमितपणे जीवनसत्वे, खनिजक्षार मिश्रण, प्रतिकारशक्ती वर्धक तसेच यकृतवर्धक औषधे देण्यात यावीत.
- रक्तक्षय झालेल्या जनावरांना रक्तवर्धक औषधे सकाळी संध्याकाळी किमान २१ दिवस देण्यात यावीत.
- ओटीपोटातील पचनासाठी आवश्यक जीवजंतू सुस्थितीत राहण्यासाठी प्री व प्रोबायोटीक औषधे त्याचप्रमाणे भूकवाढीसाठी औषधे देण्यात यावीत.

प्रकाशक : विस्तार शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर

आजारी जनावरांना औषधे पाजणे शक्यतो टाळावे. पावडर किंवा पातळ औषधे ही कणीक/पीठ/गुळ खुराक किंवा पाण्यातून देण्यात यावीत.

३. उबदार निवारा :–

- सध्या पावसाळा चालू असून जनावरांचे पाऊस व थंडीपासून संरक्षण करावे व कोणत्याही परिस्थितीत जनावरे उघड्यावर बांधू नयेत. जनावरांना योग्य तो कोरडा व उबदार निवारा उपलब्ध करून द्यावा व त्यांचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण करावे.
- पावसाची संततधार चालू असताना लहान वासरांना अंगावरती उबदार कपडे पांघरावीत. गोठयात अधिक वॅटेजचे बल्ब लावावेत जेणेकरुन उष्णता निर्माण होईल व प्रतिकूल वातावरणामुळे येणारा ताण टाळता येईल.

४. पोळी–पायावरील सुजेवर शेक देणे :–

- ज्या जनावरांना पाया समोरिल लसीका ग्रंथीवर, पायांवर किंवा छातीवर सूज आहे अशा जनावरांना बसताना त्रास होतो म्हणून कित्येक दिवस उभी राहतात. अशा जनावरांना मीठाच्या संतृप्त (मीठ पाण्यात विरघळणे बंद होईपर्यंत बनवलेले पाणी) गरम द्रावणाचा सुती कापडाच्या सहाय्याने दिवसातून २ वेळा उत्तम शेक द्यावा. तसेच मॅग्नेशियम सल्फेट (बारीक पावडर) आणि ग्लीसरीन या संयुगाचा लेप सुजेवर सकाळ संध्याकाळी लावल्यास सूज कमी होण्यास मदत मिळते.
- अंगावरील गाठी व सूज कमी करणेसाठी उन्हाच्या वेळेत गरम पाण्याची अंघोळ (शेकत / अंग चाळत) घालावी व अंग कापडाने कोरडे करावे म्हणजे सर्दी होणार नाही.
- लहान वासरांना चेहऱ्यावरील दुखऱ्या गाठीमुळे तोंडाची हालचाल करण्यास अवघड झाल्याने दुध पिता येत नाही. त्यासाठी चेहऱ्यावर गरम पाण्याने दिवसातून २ वेळा शेक दयावा व अंग टॉवेलने कोरडे करावे.

गरम पाण्याचा चटका बसणार नाही याची खबरदारी घ्यावी.

५. बसून राहणाऱ्या जनावरांची काळजी :–

- पायावरील/गुडघ्यावरील सुजेमुळे उभे राहण्यास त्रास झाल्याने किंवा अशक्तपणामुळे रोगी जनावर नेहमी बसून राहते.
- अशा जास्त वेळ बसून राहणाऱ्या जनावरांना सिमेंट कॉंक्रीटची जमीन टाळावी. अंगाखाली मऊ गवत/तुसाची गादी करावी.
- अशा बसून राहणाऱ्या जनावरांना दर २–३ तासानी बाजू बदलावी. दिवसातून दोन वेळा मदतीने उभे करावे. पाय चोळावेत/शेकावेत.

६. तोंडातील व्रणोपचार :–

- जनावरांच्या विशेषत: लहान वासरांच्या तोंडात जखमा आढळून आल्यास, तोंड पोटॅशियम परम्यांगनेटच्या द्रावणाने धुवून दिवसातून ३–४ वेळेस बोरोग्लीसरीनचे द्रावण तोंडातील जखमांवर लावावे. त्यामुळे जनावराला चारा खाण्यास/वासरांना दुध पिण्यास त्रास होणार नाही.

७. नाकाची स्वच्छता व वाफ देणे:–

- रोगी जनावरांच्या विशेषत: लहान वासराच्या नाकामध्ये काही वेळा अल्सर/जखमा निर्माण होतात, नाक चिकट स्त्रावानी भरलेले असते, काही वेळा तो घट्ट व कडक होतो. त्यामुळे श्वसनास त्रास होतो. त्यासाठी कोमट पाण्यानी नाकपुडी नियमितपणे स्वच्छ करावी. तसेच दोन्ही नाकपुडयात बोरोग्लिसरीन अथवा कोमट खोबेरतेल व बोरीक पावडरचे मिश्रण चार–चार थेंब टाकावे जेणेकरून मउपणा टिकून राहील, जखमा भरुन येतील व श्वसनासही त्रास होणार नाही.
- सर्दी असेल तर निलगीरीच्या तेलाची किंवा विक्सची वाफ दिली तर चांगला फायदा होतो.

८. डोळयांची निगा :—

- डोळ्यांत व्रण असतील तर डोळयातून पाणी येते व पूढे पांढरेपणा येतो. त्यासाठी डोळे बोरिक पावडरच्या द्रावणाने, नियमीत धुवून घ्यावेत किंवा कोमट पाण्याने साफ करावेत.

९. बैलांची काळजी :—

- रोगातून बरे झालेल्या बैलांना कामास जुंपल्यामुळे रोग प्रकोप होवून दगावत आहेत म्हणून प्रकृती ठणठणीत होईपर्यंत त्याना कामास लावू नये.

१०. जखमांचे व्यवस्थापन :—

- बाधित जनावरांमध्ये २—३ आठवड्यानंतर प्रामुख्याने सूज आलेल्या भागात विशेषत: पायावरती जखमा होतात त्याचप्रमाणे शरीरावरील गाठी फुटून जखमा होतात. त्या जखमांवर खालीलप्रमाणे उपचार करावा.
- जखमा ०.१ टक्के पोटॅशियम परम्यांगनेटच्या द्रावणाने धुवून घेतल्यानंतर त्यावर पोव्होडीन आयोडीन किंवा टिंक्चर आयोडीन लावावे आणि त्यानंतर जखमेवर मॅग्नेशियम सल्फेट व ग्लिसरीनचे मिश्रण लावून बँडेजने हळुवारपणे बांधावी.
- सोबत जखमांवर माश्या व इतर बाह्यपरजीवी बसु नयेत यासाठी दिवसातून दोन वेळा हर्बल स्प्रे जखम परिसरात फवारण्यात यावा.
- जखमेमध्ये अळया पडल्यास अशा जखमेत टरपेनटाईनच्या तेलात भिजवून कापसाचा बोळा ठेवावा आणि त्यानंतर मृत अळया बाहेर काढून घ्याव्यात. अशा जखमांवर दिवसातून दोन वेळा हर्बल स्प्रे फवारण्यात यावा.
- जखमा जास्त खोल व दुषित प्रकारच्या असल्यास हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर करून अशा जखमांचा उपचार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करून घ्यावा.

**जखमा पूर्णपणे बऱ्या होण्यासाठी नियमित ड्रेसिंग करणे गरजेचे आहे.**

११. गोमाशांचा उपद्रव :—

रोगी जनावर सुस्त झाल्याने तसेच अंगावरती जखमा झाल्याने माश्या बसतात व जनावर त्रस्त होते. रोगी जनावरांना गोचीड—गोमाश्या यांचा त्रास कमी होण्यासाठी गोठ्यात दर ३—४ दिवसांनी कीटकनाशक औषधांची फवारणी करण्यात यावी. तसेच अंगावरती हर्बल / वनस्पतीजन्य किटकनाशक औषधीचा नियमित वापर करावा. यासाठी एक लिटर पाण्यामध्ये १० मिली निंबोळी तेल, १० मिली करंज तेल, १० मिली निलगीरी तेल आणि २ ग्रॅम अंगाचा साबण मिसळावे व हे मिश्रण फवारणीसाठी वापरावे.

एकूणच बाधित जनावरांच्या उपचारादरम्यान पशुपालकानी आपल्या पशूंची काळजीपूर्वक सुश्रुषा केल्यास आपले अनमोल पशुधन लंम्पी आजारापासून वाचविण्यात उत्तम यश मिळू शकते.

*****